Cambridge Assessment International Education

# Cambridge International A Level

**MARATHI** **9688/04**

Paper 4 Texts **October/November 2024**

**2 hours 30 minutes**

* 9 9 7 2 1 7 6 7 4 5 *

You must answer on the enclosed answer booklet.

You will need: Answer booklet (enclosed)

**Invigilators must refer to the Additional Materials List for instructions on the use of set texts in the examination.**

**INSTRUCTIONS**

- Answer **three** questions in total in **Marathi**, each on a different text:
  - Answer **at least one question** from Section 1.
  - Answer **at least one question** from Section 2.
  - Answer **one other question** from **either** Section 1 **or** Section 2.
- Follow the instructions on the front cover of the answer booklet. If you need additional answer paper, ask the invigilator for a continuation booklet.
- Dictionaries are **not** allowed.

**INFORMATION**

- The total mark for this paper is 75.
- Each question is worth 25 marks.

**सूचना**

- एकूण तीन प्रश्नांची उत्तरे **मराठीतून** द्या. प्रत्येक प्रश्न वेगळ्या पाठयपुस्तकावर आधारित असावा:
  - विभाग 1 मधून **किमान एक प्रश्न** सोडवा.
  - आणि विभाग 2 मधून **किमान एक प्रश्न सोडवा**.
  - **उरलेला एक प्रश्न** विभाग 1 **किंवा** विभाग 2 मधून सोडवा.
- तुम्हाला दिलेल्या उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा. सूचना **मराठीतून** सुद्धा खाली दिल्या आहेत. अधिक पृष्ठांची जरुरी असल्यास पर्यवेक्षकांकडे मागावीत आणि पृष्ठांचा क्रम चालू ठेवावा.
- शब्दकोषाचा वापर करण्यास **मनाई** आहे.

**विशेष सूचना**

- या परिक्षेचे एकूण गुण 75 आहेत.
- प्रत्येक प्रश्नाला 25 गुण आहेत.

This document has **8** pages. Any blank pages are indicated.

DC (LK) 338977/2
© UCLES 2024


**उत्तरपत्रिकेसाठी सूचना**

काळ्या अथवा गडद निळ्या पेनाचा वापर करा. आपण कोणत्याही आकृत्या किंवा आलेखांसाठी एचबी पेन्सिल वापरू शकता.

तुमचे नाव, केंद्रक्रमांक आणि अनुक्रमांक पानाच्या वरच्या बाजूला नमूद केलेल्या चौकडीत लिहा. अक्षर स्पष्ट आणि सुवाच्य असावे.

चुका खोडण्यासाठी  कोणत्याही पेनाचा अथवा शाईचा वापर **करू नये**.
कृपया कोणत्याही बारकोडवर लिहू **नये**.

आपली उत्तरे ह्या उत्तरपत्रिकेमध्ये लिहा. कागदाच्या  दोन्ही बाजूंचा वापर करा.  प्रत्येक प्रश्नांच्या  उत्तरानंतर  दोन रिकाम्या ओळी सोडून द्या.
प्रश्न सोडवताना  प्रश्नक्रमांक  पहिल्या समासामध्ये लिहा.




प्रश्नाला उपप्रश्न असल्यास उपप्रश्नक्रमांक दुसऱ्या समासात लिहा.
उदा:- 1 ( अ )

आपल्या  प्रश्नांची पूर्वतयारी या उत्तरपत्रिकेमध्ये पेनानी करा. परीक्षकाच्या **तपासणीसाठी नसलेल्या**  लिखाणावर केवळ एक रेष मारून ते लिखाण सुवाच्य  ठेवा.

या पत्रिकेचा कोणताही भाग फाडू **नका** .

आपले सर्व लिखाण पर्यवेक्षकांकडे सोपवावे. अधिक पृष्ठांचा वापर केला असल्यास त्यांचा क्रम चालू ठेवून ती उत्तरपत्रिकेच्या आत जोडावीत.

© UCLES 2024

**BLANK PAGE**

कोणतेही **तीन** प्रश्न सोडवा. प्रत्येक प्रश्न हा वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांवर आधारित असावा. विभाग 1 मधून **एक** प्रश्न, विभाग 2 मधून **एक** प्रश्न व उरलेला **एक** प्रश्न कोणत्याही विभागातून सोडवा.

## विभाग 1

**1 सार्थ श्री ज्ञानेश्वरी – संत ज्ञानेश्वर (अध्याय अठरावा ओवी क्रमांक 261–360)**

**प्रश्न (a) किंवा प्रश्न (b) निवडा.**

**(a)**

चांदिणियाचा पडिभरु । जालयां सोमकांताचा डोंगरु ।
विघरोनि सरोवरु । हो पाहे जैसा ॥ 286 ॥
तैसें सुख आणि अनुभूती । या भावांची मोडूनि भिंतीं ।
आतलें अर्जुनाकृत्ती । सुखचि जेथ ॥ 287 ॥
तेथ समर्थु म्हणोनि देवा । अवकाशु जाहला आठवा ।
मग बुडतयाचा धांवा । जीवें केला ॥ 288 ॥
अर्जुनायेसणें धेंडें । प्रज्ञापसरेंसीं बुडे ।
आलें भरतें एवढें । तें काढूनि पुढती ॥ 289 ॥
देवो म्हणे हां गा पार्था । तूं आपणपें देख सर्वथा ।
तंव श्वासूनि येरें माथा । तुकियेला ॥ 290 ॥
म्हणे जाणसी दातारा । मी तुजशीं व्यक्तिशेजारा ।
उबगला आदीं एकाहारा । येवों पाहें ॥ 291 ॥
तयाही हा ऐसा । लोभें देतसां जरी लालसा ।
तरी कां जी घालीतसां । आड आड जीवा ॥ 292 ॥
तेथ श्रीकृष्ण म्हणती निकें । अद्यापि नाहीं मा ठाउकें ।
वेडया चंद्रा आणि चंद्रिके । न मिळणें आहे ॥ 293 ॥
आणि हाही बोलोनि भावो । तुज दाऊं आम्ही भिवों ।
जे रुसतां बांधे थांवो । तें प्रेम गा हें ॥ 294 ॥

**(i)** वरील अभंगात 'चंद्रा आणि चंद्रिके' चा उल्लेख कसा केला आहे?

**(ii)** वरील अभंगांच्या संदर्भात, कर्म आत्म्यापासून वेगळे आहे याच्या स्पष्टीकरणासाठी कोणत्या उपमा वापरल्या आहेत?

**अथवा**

**(b)** अभ्यासक्रमात नमूद केलेल्या अभंगांच्या संदर्भात, अर्जुनाच्या मनावस्थेचे वर्णन करा.

**2 सार्थ श्री तुकारामाची गाथा – संत तुकाराम (अभंग क्रमांक 1701–1800)**

**प्रश्न (a) किंवा प्रश्न (b) निवडा.**

**(a)**

घालुनियां मापीं । देवभक्त बैसले जपीं ॥
तैसी होते सांडउलंडी । निजनिजांची मुकुंडी ॥
अमूपीं उखतें । आपण वोस आपण यातें ॥
देव आतां झाला । उगवे संकोच वहिला ॥
अखंड नेलें वेठी । भार सत्याविण गांठी ॥
आडकिला झोंपा । रिता कळिवराचा खोंपा ॥
गोदातीरीं आड । करिते करविते द्वाड ॥
तुका म्हणे बळें । उपदेशाचें तोंड काळें ॥ 1715 ॥

उंबरांतील कीटका । हेंचि ब्रह्मांड ऐसें लेखा ॥
ऐसी उंबरें किती झाडीं । ऐशी झाडें किती नव खंडी ॥
हेंचि ब्रह्मांड आम्हांसी । ऐसीं अगणित अंडें कैसीं ॥
विराटाचे अंगी तैसे । मोजूं जातां अगणित केश ॥
ऐशा विराटाच्या कोटी । सांठवल्या ज्याच्या पोटीं ॥
तो हा नंदाचा बाळ मुकुंद । तान्हा म्हणवी परमानंद ॥
ऐसी अगम्य ईश्वर लीळा । ब्रह्मानंदीं गम्य तुकयाला ॥ 1716 ॥

ब्रह्मज्ञान जरी एके दिवशीं कळे । तात्काळ हा गळे अभिमान ॥
अभिमान लगे शुकाचिये पाठी । व्यासें उफराटी दृष्टी केली ॥
जनकभेटीसी पाठविला तेणे । अभिमान नाणें खोटें केलें ॥
खोटें करुनियां लाविला अभ्यासीं । मेरूशिखरासी शुक गेला ॥
जाउनियां तेणें साधिली समाधी । तुका म्हणे तधीं होतों आम्ही ॥ 1717 ॥

**(i)** वरील अभंगाच्या संदर्भात, तुकारामानी श्रीहरीच्या लीलेचे कसे वर्णन केले आहे?

**(ii)** वरील अभंगाच्या संदर्भात, मेरुपर्वतावर कोण गेले आणि तेथे काय घडले?

**अथवा**

**(b)** अभ्यासक्रमात नमूद केलेल्या अभंगांच्या आधारे, तुकारामांच्या परमेश्वरावरील श्रद्धेचे उदाहरणासहित वर्णन करा.

© UCLES 2024

**3 रिकामे मधुघट – भा. रा. तांबे**

**प्रश्न (a) किंवा प्रश्न (b) निवडा.**

**(a)**

मधु मागशि माझ्या सख्या, परी
मधुघटचि रिकामे पडति घरीं! ॥ धृ ॥

आजवरी कमळाच्या द्रोणीं
मधू पाजिला तुला भरोनी,
सेवा ही पूर्विची स्मरोनी,
करिं रोष न सखया, दया करीं ॥ 1 ॥

नैवेद्याची एकच वाटी
अता दुधाची माझ्या गाठीं;
देवपुजेस्तव ही कोरांटी
बाळगी अंगणीं कशी तरी ॥ 2 ॥

तरुण-तरुणिंची सलज्ज कुजबुज,
वृक्षझऱ्यांचें गूढ मधुर गुज,
संसाराचें मर्म हवें तुज,
मधु पिळण्या परि रे बळ न करीं! ॥ 3 ॥

ढळला रे ढळला दिन सखया!
संध्याछाया भिवविति हृदया,
अता मधूचें नांव कासया?
लागले नेत्र रे पैलतिरी. ॥ 4 ॥

**(i)** वरील कवितेच्या संदर्भात, आपल्या 'सखयानी' रोष धरु नये, असे कवीला कां वाटते?

**(ii)** 'रिकामे मधुघट', हे शीर्षक या भावनात्मक कवितेला कसे भिडणारे आहे ते स्पष्ट करा.

**अथवा**

**(b)** वरील कवितेतील भावनांची तुलना अभ्यासक्रमात नमूद केलेल्या दुसऱ्या भावनात्मक कवितेशी करा.

© UCLES 2024

## विभाग 2

**4 नटसम्राट – वि. वा. शिरवाडकर**

**प्रश्न (a) किंवा प्रश्न (b) निवडा.**

**(a)** 'नटसम्राट' या वि. वा. शिरवाडकर लिखित नाट्यातील आप्पासाहेब बेलवलकरांची व्यक्तिरेखा उदाहरणासहित स्पष्ट करा.

**अथवा**

**(b)** 'नटसम्राट' या वि. वा. शिरवाडकर लिखित नाट्यातील एका भावनात्मक प्रसंगाचे विश्लेषण करा.

**5 मराठीलघुकथा – कथासंग्रह**

**प्रश्न (a) किंवा प्रश्न (b) निवडा.**

**(a)** लेखक वामन चोरघडे यांनी कथेला 'अतिथी देवो भव' हे शीर्षक कां दिले आहे?

**अथवा**

**(b)** लेखिका इरावती कर्वे यांनी 'आजोबा' या कथेत कोणता संदेश दिला आहे ते उदाहरणासहित स्पष्ट करा.

**स्मृतिचित्रे – लक्ष्मीबाई टिळक**

**6 प्रश्न (a) किंवा प्रश्न (b) निवडा.**

**(a)** 'स्मृतिचित्रे' या कादंबरीत लेखिका लक्ष्मीबाई टिळक यांनी तात्कालीन समाजाचे चित्रण कसे केले आहे, ते उदाहरणासहित स्पष्ट करा.

**अथवा**

**(b)** 'स्मृतिचित्रे' या कादंबरीतील उत्कट प्रसंगांचे विश्लेषण करा.

© UCLES 2024

**BLANK PAGE**

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

To avoid the issue of disclosure of answer-related information to candidates, all copyright acknowledgements are reproduced online in the Cambridge Assessment International Education Copyright Acknowledgements Booklet. This is produced for each series of examinations and is freely available to download at www.cambridgeinternational.org after the live examination series.

Cambridge Assessment International Education is part of Cambridge Assessment. Cambridge Assessment is the brand name of the University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is a department of the University of Cambridge.

© UCLES 2024 